2015/22 B

Parth Vidya Prasarak Mandal's

# BABUJI AVHAD MAHAVIDYALYA

Pathardi, Dist-Ahmednagar. 414102 (MH)

(Affiliated to Savitribai Phule Pune University,Pune)
NAAC Re-Accredited A Grade
ISO 9001- 2008 Certified.

## UGC Sponsored

Two Day

## NATIONAL SEMINAR

9th & 10th Oct. 2015

On

# "SOCIETY ART & CULTURE IN INDIA DURING THE MUGHAL PERIOD"

Organized by

**DEPARTMENT OF HITORY**




Associate Editor
**Prof. A. S. Kerkal**
Assit. Professor Dept. of History

Chief Editor
**Prof. Dr. A.K. Kanade**
Head & Assit. Professor Dept. of History


Scanned by CamScanner

109-112

|| न ही ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ||

PARTH VIDYA PRASARAK MANDAL'S

# BABUJI AVHAD MAHAVIDYALAYA

Pathardi, Dist-Ahmednagar. (MH)

(Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune)

NAAC Re-Accredited A Grade

ISO 9001-2008 Certified.

**University Grants Commission (WRO,Pune)**

**Sponsored**

Two day National Level Seminar

**on**

**"Society, Art & Culture in India During the Mughal Period."**

9th & 10th October 2015.

Organized by

**DEPARTMENT OF HISTORY**

---

**Publisher**
**Dr. G.P. Dhakane**
(Principal)

**Associate Editor**
**Prof. A.S. Kerkal**
Assistant Professor
Department of History

**Chief Editor**
**Dr. A. K. Kanade**
Head & Assistant Professor
Department of History

**ISBN No.** 978-93-83401-28-4

Scanned by CamScanner

# "SOCIETY, ART & CULTURE IN INDIA DURING THE MUGHAL PERIOD."

**Place of Publication** : Parth Vidya Prasarak Mandal's
BABUJ AVHAD MAHAVIDYALAYA
Pathardi, Dist-Ahmednagar. (M.S.)

**Publisher** : Dr.G.P.Dhakane (Principal)

**Chief Editor** : Dr. A.K.Kanade

**Printed by** : Shri.Vaynkatesh Printers/Xerox, Ahmednagar.

**Front Page** : Satish Kulkarni, Ahmednagar

**DTP** : Arvind Homkar, Ahmednagar.

**Date of Publication** : 9th October 2015

**Prize: Rs. 400/-**

**ISBN:** 978-93-83401-28-4

**Note**: The views expressed by the authors in their research papers in this book are their own. The Editor/Publisher/Printers is not responsible for them.

Scanned by CamScanner

| |
|---|
| भाष्य |
| मध्ययुगीन कालखंडातील बहुपत्नी पध्दत |
| मोगलकालीन चित्रकला |

Scanned by CamScanner

**29**

# मुघल इतिहासावरील युरोपीयन प्रवाशांचे भाष्य

संशोधक विद्यार्थी दिपक बाबुलाल धोबी
मु.पो. गोदेगांव, ता. जामनेर, जि. जळगांव. मो. नं. ९७६७३६७९६३७.
(Affiliated to N.M. University, Jalgaon)

मुघल काळातील इतिहासाचे लेखनाचे स्वरुप चरित्रासारखे वाटते. ही चरित्रे व्यक्तिनिष्ठ असल्यामुळे संबंधित व्यक्तीमध्ये विभूतमत्व स्पष्ट करणे हाच लेखनांचा मुलभुत हेतु असल्याचे जाणवते. आपल्या नायकाला उदात्ततेच्या पातळीवर आणण्यासाठी लेखकांने बऱ्याच वेळा पक्षपात केल्याचे दिसते. परंतु प्रेरणा भिन्न असल्यामूळे त्याला दोष देता येत नाही.[१] दरबारी इतिहास लेखनासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाचे व सवयींची संधी लेखकाला कधीच मिळत नसते. त्यामुळे परंपरेला पुर्वसरींनी जे केले आहे त्याचीच पुनरावृत्ती झाल्याचे आपणास दिसते. त्यापुढे जावून आपले लेखन अतिरंजित व्हावे अशी त्यांची भुमिका असल्यामुळे घटनांचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण न करता त्यांनी गूढवादी पध्दतीने विश्लेषन करण्याचा प्रयत्न केला. ही गुढवादी बैठक साध्य झाली की, मग त्यामध्ये अनेक गोष्टी घुसळल्याचे दिसते.[२] सुलतान कालखंड हा जरी भारतीय इतिहास लेखन शास्त्रातील शिकाऊ कालखंड होता असे [Probation Period] असे म्हटले तर मोघल कालखंड हा त्याचा पुढचा टप्पा होता. असे म्हणावयाच हरकत नाही.[३] परंतु मुघल काळात जे युरोपीयन प्रवासी आलेत त्यांच्या प्रवास वर्णनात मात्र मुघल काळावरील भाष्य हे मुघल दरबारी ईतिहासकारापेक्षा वेगळे केल्याचे दिसते. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये संशोधकांने मुघल दरबारात आलेल्या युरोपीयन प्रवाशांच्या वर्णनाचा मागोवा घेतला आहे.

**फादर एन्थोनी मोनसेरात :-** मोनसेरात हा अकबर दरबारात १५७८ मध्ये आला त्यांने आपल्या प्रवास वर्णनात अकबराच्या पोशाख, शरीररचना, धार्मिकता यांचे वर्णन केले आहे. फादर मोनसेरात मुरादचा नियुक्त शिक्षक होता. मोनसेरतने आपल्या प्रवास वर्णनात सुरत, मांडु, सिरीज, नरवर, ग्वालीयर, दिल्ली, सोनीपथ, सरहिंद इ. शहारांचे वर्णन केले आहे. तो म्हणतो की, भारत के नगर दुर से देखने पर तो बडे सुहावने लगते है, किंतु अंदर से देखो तो संकरे और बेतरतीब नजर आते है घरोमे खिडकीया दिखाई नही देती [४] लाहोर शहराचे वर्णन करतांना तो म्हणतो यह शहर अपने आकार प्रकार, जनसंख्या और धनदौलत के लिए किसी अच्छे शहर से कम नही है दुनियाँ के हर हिस्से की सौदागरोंकी यहाँ भिड लगी रहती है [५] तसेच मुघल कालीन सैन्य व व्यापारासंबंधी असलेली व्यवस्था त्याला प्रवासात आढळून आली त्याचे वर्णन तो करतो. दरबार की कार्यवाही का रिकार्ड रखने की प्रथा यहाँ है, ईस काम के लिए चार पाच सचिव होते है, जो शाही खजाने में लेन देन का बारी बारी से पुरा विवरण लिखते थे [६] घोडोका व्यापार शाही इजाजत के बैगेर नही हो सकता न्याय व्यवस्था डाक, वाहको जलघडी और घडीयाल एवंम नौरज उत्सव के बारे मे भी लिखा है [७] साधारणत: धार्मिक परंपरा किंबहूना बालनायी संप्रदायाचे वर्णन तो करतो. स्वंय अकबर नंगे पाव व खुले बाल के ईस संप्रदाय के प्रमुख महंत के दर्शन करने गया [८] मुघल कालीन सतीव्यवस्थे संदर्भात मोनसेरात म्हणतो की, विधवाओंको नशिले दवा देकर बेहोश कर दिया जाता था ताकी उन्हे जलने का दर्द महसुस न हो और तब बेहोशी की हालत मे उन्हे चेतावणी प्रार्थना और आश्वासन के साथ चिता पर ढकेल दिया जाता था अकसर उन्हे बलपुर्वक ही चिता पर बिठाया जाता था यदी वे चिता से कुदकर भागने की कोशिश करती तो उन्हे दंडो से ऐसा करनेसे रोका जाता था [९] मोनसेरतने

मुघलकालीन राज व्यवस्था सामाजिक धार्मिक परिस्थितीचे यथार्थ उभे वर्णन केले आहे. ज्यातुन ऐतिहासिक पैलुंचे सत्य वर्णन पहावयास मिळते.

**विलियम हॉकिन्स :-** हॉकिन्स हा ईस्ट इंडिया कंपनीचा एक कर्मचारी व व्यापारी होता, १६०८ ते १६१३ या पाच वर्षात तो भारतात वास्तव्यास होता त्याला फारशी भाषा ज्ञात होती. जहाँगीरद्वारा दिल्या जाणाऱ्या मेजवाणीत त्याला निमंत्रीत केली जाई. जहाँगीर दरबारातील वर्णन वस्तुनिष्ठ वाटते. तो लिहतो की, भाषा को जवहरतोका शौक था कीस दिन कौन कौनसो और कितनी मात्रा मे हिरे जवाहारात पहने है ईस हिसाब से वह विभाजीत थे [१०] नित्य नमाज केल्यावर जहाँगीर बाहेरुन येवून झरोका दर्शन देत असे. तीनवाजता जहाँगीर दरबार आममध्ये सहभागी होत असे ते पुर्ण झाल्यानंतर दरबार खासमध्ये जात असे. जहाँगीराच्या दरबाराचा खर्च दैनंदिन तीस हजार होता हॉकिन्स म्हणतो की, बादशाह खजाने और शेरो को छोडकर अन्य सभी का प्रतिदीन निरीक्षण करता था. [११]

**रे - टेरी :-** रे - टेरी हा इ.स. १६१५ ते १६१८ पर्यंत हिंदुस्थानात वास्तव्यास होता तो म्हणतो की, हिंदुस्थानात गहू, तांदूळ, व दुसऱ्या प्रकारची धान्ये उत्तम प्रकारची व स्वस्त मिळतात. येथील गव्हांची भाकर विलायतेपेक्षा शुभ्र होते [१२] टेरी म्हणतो की, येथील लोकांच्या वाटेस न गेल्यास ते प्रत्येकाशी सौजण्यांने वागतात, प्रारंभीतो सुरत व नंतर मांडव गडास गेला त्याच्या बरोबर बादशाहास देण्याचे नजराने असुन वीस इतदेशिय शिपाई, सहा गाडे एवढा संरजाम होता. हा प्रवास सुमारे ४०० मैलांचा होता. [१३] प्रवासात धोका वाटल्यास शेजारच्या गांवातुन घोडेस्वरांचा पहारा मिळविण्याविषयी त्याच्या जवळ परवाना होता हिंदुस्थानातील नौकर लोकांचे इमान विलक्षण आहे सुमारे त्यांचा पगार अडीचरुपये दरमहा असुन तो बहुताह दरप्रतिपदेस अगाऊ द्यावा लागेल फौजेत असंख्य लोक आहेत, अधिकारी युध्दकलेत निष्णांत नाही. सेनानाईकास ज्ञान नसल्यामुळे फौज लगंडी आहे. [१४]

**पिटरा डिला व्हेल :-** इटालियम प्रवासी रोमन कॅथोनिक पंथाचा अभिमानी असुन इजिप्त व हिंदुस्थान देशातील धर्मात काही साम्य आहे की, काय ? हे पाहण्यासाठी भारतात आला [१५] भारतात सुरत व गोवा या भागात त्याने प्रवास केला सोबत त्यांने त्याची पत्नी आणलेली होती, परंतु प्रवासात ती मृत्यू पावल्यांने त्याला आतोनात दुख झाले म्हणून त्यांने तिचे शव मसालाभरुन बरोबर घेतले तो वयाने ३७ वर्षाचा होता डिलाव्हेल येथील लोकांच्या आचार विचाराविषयीचे वर्णन करतो तो म्हणतो की, सुरतमध्ये हिंदु स्त्रियांना सती जाण्याची बंदी असे. तरी सुबेदाराची विशेष परवानगी घेवून सती जाणे शक्य होते. [१६] देवीची पुजा येथे केली जाईल पार्वती देवीची पुजा तिचा चेहरावर खोदून लोक तिची पुजा करीत ती देवी नवसास पावते असा सार्वत्रिक समज होता [१७] खंबायत येथे लंगड्या व आजारी जनावरास व पक्षास कोसण्याचा आणि त्यास औषोधपचार करण्याचा एक पांझर पोड असुन त्याचा सर्व खर्च हिंदू लोक मोठया भकतीने करीत. येथे उंदीरही पाळले जात असत. [१८] नंतर तो गोवा कर्नाटक व ओलाझा आणि कालिकतला गेला तेथून तो आलेपो या मार्गाने युरोपात निघून गेला.

**जॉन अलबर्ट ड मंडेस्लो :-** जॉन अलबर्ट १६३८ च्या एप्रिल महिण्यात सुरत बंदरावर ईरानहून उतरला तो चोवीस वर्षाचा होता तो सुरत, अहमदाबाद व नंतर आग्राला गेल्यानंतर वाटेत त्याचे रस्त्यावरच्या राजपुत लोकांशी भाडंण झाले तो म्हणतो की, आग्राचा व्यापार बहुतेक देशांशी चालत





असे. [१८] येणाऱ्या जाणाऱ्या मालावर १० टक्के जकात घेण्याची वहीवाट असे शहरात रस्ते चांगले रुंद होते, प्रवाशाकरीता तीनमजली अशा ८० धर्मशाळा होत्या प्रत्येक धर्मशाळेत तळघरे, तवेले वंगेरे होते एक अधिकारी नेमलेला असे तो प्रवाशांना दानावैरण व इतर सामानपुरवी [१९] इस १६४० मध्ये तो इंग्लंडला गेला तेथून काही दिवस लष्करात नौकरी करुन पॅरीस येथे देवीच्या आजारांने मरण पावला.

फ्रॉन्सीस बर्नियर :- शहाजहान काळात वयाच्या ३० वर्षी दिल्लीत आला तो १६५५ पासुन १६६७ पर्यंत १२ वर्षापर्यंत हिंदुस्थानात होता फाजलखॉन नामक सरदाराची ओळख घेवून त्याच्या जवळ बर्नियर राहिला तो म्हणतो की, फाजलखाँन सदगृहस्थ असुन औरंगजेबाचा मुख्य वजीर होता. त्याचे दुसरे नांव दानिष्मंदखान होते. त्याच्या आश्रयास बर्नियर दिल्ली येथे राहिला बर्नियरने फाजलखानास युरोपियन भाषा शिकविल्या त्याच करीता अनेक सुंदर लॅटिन ग्रथांची भाषांतरे केली [२०] औरंगजेबाने राज्य प्राप्तीकरीता जी कटकारस्थाने केली त्याचे हुबेहुब चित्तवेधक वर्णन बर्नियरने केले आहे. [२१] हे वर्णन त्यांने युरोपात परत गेल्यावर केले.

**जॉन बटिस्टा टॅव्हर्नियर :-** टॅव्हर्नियर हा एक फ्रेंच व्यापारी होता, इस १६४० ते १६६७ दरम्यांन हिंदुस्थानात वास्तव्यास होता तो एक फ्रेंच जव्हेरी होता [२२] त्याच्या प्रवास वर्णनात धंदा व्यापाराविषयीची माहिती मिळते. तो म्हणतो मुघलांच्या वेळेस हिंदुस्थानातील रस्ते फार चांगले होते, रोमन लोकाप्रमाणे रस्ते साफ ठेवण्याकडे मुघलांचे विशेष लक्ष असे [२३] त्यावेळी टपालाची व्यवस्था चांगली होती टपाल घोड्यापेंक्षा लवकर जाई रस्त्यावर दर दहा मैलावर झोपड्या बांधलेल्या असुन त्यात पाईप पळणारे टपालवाले तयार राहत मागच्या पळणाऱ्यांनी टपाल आणुन टाकल्याबरोबर नविन लोक पळून पुढील मुकामास जात ज्या ठिकाणी रस्ते बांधलेली नसत तेथे झाडांच्या खाना खुणावरुन वाटा ध्यानात ठेवण्याचा प्रचार असे. [२३] ज्या ठिकांणी झाले नसत तेथे ५०० पावलांच्या अंतरावर दगडांची रास करुन ते चुण्यांनी सारवित जेणे करुन अंधाऱ्या रात्री व पावसाच्या काळोखात सुध्दा टपालवाल्यास रस्ता सापडण्यास अडचण येत नसे हे काम सफेदी लावणे दुरुस्त ठेवणे गावांच्या लोकांकडे सोपविणे जात असे त्याच्या वर्णणात व्यापार, पशु पक्षी, तलाव, मशिदी, देवालय इ. नाना प्रकारच्या विषय वर्णनांनी त्याचे पुस्तक भरलेले आहे.

**थिवेनॉट :-** हा कुलीन घराण्यातील असुन पॅरीस विद्यापिठातून शिक्षण घेवून तो १६६६ मध्ये सुरत येथे आला त्याचे वय ३४ वर्ष एवढे होते अहमदाबाद येथे त्यांने मशिद पाहिली, पुर्वी तेथे हिंदूदेवालय असुन औरंगजेबाने ते मोडले आणि त्याची मशिद केली. त्यावेळी त्या ठिकाणी बादशाहने पुष्कळ गाई मारुन ती जागा विटाळून पुन्हा हिंदूच्या निरुपयोगी करुन टाकली [२४] मुस्लीमास मुर्ती पसंत नसल्सामुळे बादशाहाने सर्व मुर्तीचे नांक तोडून टाकले, डिलाव्हेलने वर्णलेली पशुपक्षांची शुश्रूशागृहे थिवेनॉटने अहमदाबाद येथे पाहिली. भाटामध्ये चारन म्हणून एक जात आहे. त्यास लोक पवित्र समजुन त्यांच्या वाटेस कोणी जात नसत चारनास जो कोणी ठार मारीत त्यास लोक जातीभ्रष्ट समजत म्हणून प्रवाशी लोक आपणाबरोबर चारण जातीचा एक पुरुष व बायको दररोज २ रुपये देवून बाळगीत [२५] शिवाय सुरत मधील राज्य कारभाराचे वर्णन थिवेनॉटने केले आहे.

**कार्स्टननीवर :-** रोमचा प्रसिध्द इतिहासकार त्याचा बाप कार्स्टनीवर डेन्मार्कचा राज पाचवा फेंड्रीक याच्या नौकरीत इजिप्त देशात होता तो इस १७६३ मध्ये मुंबई व सुरत येथे आला येथील



Scanned by CamScanner

ISBN NO. 978-93-83401-28-4

असलेल्या भौगोलिक व पर्यावरणांचे तो वर्णन करतो तो म्हणतो की, इतदेशीय लोकास रोगराई बाधत नाही ते पुष्कळ दिवस जगतात त्याचे कारण असे की, ते लोक अंगाभोवती मोकळी हवा खेळेल असे सैल व पायघोळ कपडे वापरतात. मासाहार व मद्यपान करीत नाही आणि रात्रीचे भोजन दिवस मावळल्यावर पुष्कळ वेळांने करतात यावरुन असे दिसते की, युरोपीयन अचार विचार हिंदुस्थानात लागु पडत नाही. हे त्यावेळच्या लोकांना कळून चुकले होते.

अशा प्रकारे युरोपीयन प्रवाशांनी लिहलेली माहिती नाना विध आहे. हिंदु राजनिती संबधीची पाश्चत्यांनी विशेष हकीकत दिलेली नाही. युरोपीयन प्रवाशांच्या लिखानातुन त्यांचा वैयक्तीक दृष्टीकोन किंबहूना पेशाला अनुसरुन वर्णन मुगल काळातील दिसून येते. तथापी काळी मुघल इतिहासकारांच्या तुलनेत पाश्चात्य प्रवाशांचे वर्णन यथार्थ व हुबेहूब आढळते.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**


१. मोरवंचीकर रा. श्री. :- इतिहासलेखन शास्त्र व इतिहासकार विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९९ पृष्ठ क्र. १००.

२. किता :

३. गायकवाड आर. डी. :- इतिहास लेखनशास्त्र फडके प्रकाशन कोल्हापूर सरदेसाई बी. एन. तृतीय आवृत्ती १९९० पृष्ठ क्र. २९०.

४. वर्मा हरीशचंद्र [संपा] :- मध्यकालीन भारत भाग २ हिंदी माध्यम कार्यान्वय निर्देशालय दिल्ली. २३ वी पूर्नमुद्रण २०११ पृष्ठ क्र. ६४२.

५. किता

६. किता

७. किता पृष्ठ क्र. ६४५.

८. कत्ता

९. गर्गे स. मा. [संपा] :- मुसलमांनी रियासत [ गो. स. सरदेसाई ] खंड २ पॉप्युलर प्रकाशन मुंबई. पाचीवी आवृत्ती १९९३. पृ. क्र. ३६२.

१०. किता पृष्ठ क्र. ३६३.

११. किता पृष्ठ क्र. ३६८.

१२. किता

१३. किता पृष्ठ क्र. ३६९

१४. किता

१५. किता पृष्ठ क्र. ३९१

१६. किता पृष्ठ क्र. ३७१

१७. किता पृष्ठ क्र. ३७८

१८. किता पृष्ठ क्र. ३८२.


Scanned by CamScanner